सन २०१७-१८ मध्ये केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत- वन शेती उप अभियान राबविण्यासाठी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी रु.७९.१७ लक्ष निधी वितरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांकः शाशेअ-०३१८/ प्र.क्र.७६/१७/१४अे

मादाम कामा मार्ग, हुमात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय (विस्तार), मुंबई- ४०० ०३२

तारीख: २८ मार्च, २०१८.

वाचा

१) वन शेती उप अभियानाच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना.

२) शासन निर्णय क्रमांक शाशेअ-२०१७/प्र.क्र.१२६/४अे, दि. ८ डिसेंबर, २०१७.

३) केंद्र शासनाचे पत्र क्र.७-६/२०१७-सीसी, दि. १५ मे, २०१७.

४) केंद्र शासनाचे पत्र क्र.७-६/२०१७-सीसी, दि. २३ जोनवारी, २०१८.

५) शासन निर्णय क्रमांक- शाशेअ-०३१८/ प्र.क्र.७६/१७/१४अे, दि.१९ मार्च, २०१८.

६) आदिवासी विकास विभाग- शासन निर्णय क्रमांक-बीयुडी-२०१७/प्र.क्र.११/कार्यासन-६, दि.१९ मार्च, २०१८.

७) शासन निर्णय क्रमांक- शाशेअ-०३१८/ प्र.क्र.७६/१७/१४अे, दि.२२ मार्च, २०१८.

प्रस्तावना

केंद्र शासनाने सन २०१७-१८ या वर्षापासून राष्ट्रीय शाश्वत शेती अभियाना अंतर्गत- वन शेती उपअभियान राबविण्याचे निश्चित केले आहे. सदर उप अभियानाच्या मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाने निर्गमित केल्या आहेत. केंद्र शासानाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सदर उप-अभियानामध्ये केंद्र व राज्य हिश्श्याचे प्रमाण ६०:४० असे आहे. ज्या राज्यांनी वृक्ष तोड व लाकडांची वाहतूक याबाबातचे नियम शिथिल केले आहेत अशाच रांज्यामध्ये उप अभियान राबविण्यात येणार आहे. वन शेती उप-अभियानाच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र राज्याचा समावेश करण्यात आला आहे. सदर उप-अभियान राज्यात राबविण्यासाठी दि. ८ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

वनशेती उप-अभियानाची सन २०१७-१८ या वर्षात राज्यात अमंलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाने संदर्भाधीन अनु.क्र.४ येथील दि. २३ जानेवारी, २०१८ च्या पत्रान्वये केंद्र हिस्सा रु. ३९८.९४ लक्ष

व त्या प्रमाणात आवश्यक राज्य हिस्सा रु.२६५.९६ लक्ष असा एकूण रु.६६४.९० लक्ष एवढया रक्कमेच्या कार्यक्रमास सुधारीत मान्यता कळविलेली आहे. त्याचप्रमाणे संदर्भाधीन अनु.क्र.३ येथील दि.१५ मे, २०१७ च्या पत्रान्वये केंद्र हिश्श्याचा रु.४०० लक्ष एवढा निधी वितरीत केला आहे. यामध्ये सर्वसाधारण प्रवर्गासाठी रु. ३१५ लक्ष, अनुसूचित जातीसाठी रु.४७.५० लक्ष व अनुसूचित जमातीसाठी रु.३७.५० लक्ष एवढया रक्कमेचा समावेश आहे. त्यानुसार, सदर कार्यक्रमाची सन २०१७-१८ या वर्षात अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र हिस्सा रु.३९८.९४ लक्ष व राज्य हिस्सा रु.२६५.९६ लक्ष अशा एकूण रु. ६६४.९०लक्ष निधीच्या कार्यक्रमास संदर्भाधीन अनु.क्र.५ येथील दि.१९ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, सर्वसाधारण प्रवर्गाचा केंद्र हिश्श्याचा रु.३१५ लक्ष व त्याप्रमाणात आवश्यक राज्य हिस्सा रु. २१० लक्ष असा एकूण रु. ५२५ लक्ष निधी आयुक्त, कृषी यांना बीडीएस प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यात आला आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गाचा केंद्र हिश्श्याच्या रु. ३७.५० लक्ष व त्याप्रमाणात आवश्यक राज्य हिस्सा रु.२५ लक्ष असा एकूण रु. ६२.५० लक्ष निधी संदर्भाधीन अनु.क्र.७ येथील दि. २२ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये आयुक्त, कृषी यांना बीडीएस प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यात आला आहे. अनुसूचित जाती प्रवर्गाचा केंद्र हिश्श्याचा रु. ४७.५० लक्ष व त्याप्रमाणात आवश्यक राज्य हिस्सा रु. ३१.१७ लक्ष असा एकूण रु. ७९.१७ लक्ष निधी आयुक्त, कृषी यांना बीडीएस प्रणालीवर (BEAMS) आयुक्त, कृषी यांना वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. अनुषंगाने खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय

१. सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत- वन शेती उप अभियानांतर्गत “अनुसूचित जाती प्रवर्गासाठी” रु. ७९.१७ लक्ष (अक्षरी रूपये एकोणऐंशी लक्ष सतरा हजार फक्त) निधी आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यात येत आहे. सदर निधीचे केंद्र व राज्य हिश्श्याचे विवरण पुढीलप्रमाणे आहे :-

(रक्कम ₹ लाख)

अ.क्र	योजनेचे नांव	अनुसूचित जाती प्रवर्ग		
		केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	एकूण निधी
१	राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत- वन शेती उप अभियान	४७.५०	३१.१७	७९.१७

२. या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत वन शेती उप अभियान “अनुसूचित जाती प्रवर्गासाठी” केंद्र हिश्श्याचा रु.४७.५० लक्ष निधी (अक्षरी :रुपये सत्तेचाळीस लक्ष पन्नास हजार फक्त) व राज्य हिश्श्याचा रु. ३१.१७ लक्ष (अक्षरी: रुपये एकतीस लक्ष सतरा हजार फक्त), असा एकूण रु. ७९.१७ लक्ष (अक्षरी: रुपये एकोणऐंशी लक्ष सतरा हजार फक्त) निधी वितरीत करण्यात आला असून तो सन २०१७-१८ करीता केंद्र व राज्य हिश्श्याच्या पुढील लेखाशीर्षतर्गत अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीतून खर्ची टाकावा :-

केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा
मागणी क्रमांक-डी-३ २४०१,पीक संवर्धन, ७८९ अनुसूचित जाती घटक योजना (००) (३१) राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान- वन शेती उप- अभियान (कें.पु.यो.) (अजाऊयो) (केंद्र हिस्सा-६०%) (२४०१अे८६२) ३३ अर्थसहाय्य,	**मागणी क्रमांक-डी-३** २४०१,पीक संवर्धन, ७८९ अनुसूचित जाती घटक योजना (००) (३२) राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान- वन शेती उप- अभियान (कें.पु.यो.) (अजाऊयो) (राज्य हिस्सा-४०%) (२४०१अे८७१) ३३ अर्थसहाय्य,

३. सदर निधी फक्त अनुसूचित जाती/नवबौध्द लाभार्थ्यांकरीता खर्च करण्यात यावा.

४. सदर निधी लाभार्थ्यांना PFMS प्रणालीद्वारे वितरीत होत असल्याची खातरजमा आयुक्त, कृषी यांनी करावी.

५. सदर निधी खर्च करताना संदर्भाधीन अनु.क्र.१ येथील केंद्र शासनाच्या उप अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

६. सदर निधी खर्च करताना तो विहित कार्यपध्दती अनुसरून, सर्व वित्तीय कायदे/ नियमांचे/ प्रक्रियेचे व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अमंलबजावणी यंत्रणानी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठल्याही शासन निर्णयाचा वा परिपत्रकाचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहील.

७. सदर निधी उप अभियानांतर्गत चालू वर्षासाठी मंजूर वार्षिक आराखड्यानुसार अनुसूचित जाती प्रवर्गासाठी याच वर्षात खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

८. सदर निधीचे जिल्हा निहाय वितरण करण्यास तसेच खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी कृषी संचालक (फलोत्पादन) यांना राज्य नियंत्रक म्हणून घोषित करण्यात येत आहे, तसेच, सदर निधीचे आहरण व संवितरण करणेसाठी विविध स्तरावरील अधिकाऱ्यांना पुढीलप्रमाणे नियंत्रण तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे:-

अ.क्र.	स्तर	नियंत्रण अधिकारी	आहरण व संवितरण अधिकारी
१.	आयुक्तालय स्तर	संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, पुणे	सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२.	विभाग स्तर	संबंधित विभागीय कृषी सह संचालक	संबंधित विभागीय कृषी सह संचालक कार्यालयातील लेखाधिकारी
३.	जिल्हा स्तर	संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी	संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील लेखाधिकारी
४.	उप विभागीय स्तर	संबंधित उप विभागीय कृषि अधिकारी	संबंधित उप विभागीय कृषि अधिकारी
५.	तालुका स्तर	संबंधित तालुका कृषी अधिकारी	संबंधित तालुका कृषी अधिकारी

९.सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल,२०१७ च्या शासन परिपत्रकातील अटींच्या पालनेच्या अधीन राहून व वित्त विभागाचे परीपत्रक अर्थसं- २०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३० जून, २०१७ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर निधी सामाजिक न्याय विभागाने दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८११५९४२९३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2018.03.28 12:02:06 +05'30'

(श्रीकांत आंडगे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

३. सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

४. आयुक्त (सामाजिक न्याय), पुणे.

५. कुलगुरू, कृषी विद्यापीठे (सर्व)

६. संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय,पुणे

७. सर्व सन्माननीय विधीमंडळ सदस्य द्वारा विधानमंडळ सचिवालय, मुंबई

८. सर्व संचालक / सहसंचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

९. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, दिनकरराव देसाई मार्ग, गोरेगाव (पूर्व) मुंबई- ६५

१०. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)

११. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)

१२. सर्व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद

१३. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, मुंबईनागपूर/ (लेखा परिक्षा(/(लेखा व अनुज्ञेयता)

१४. महालेखाकार (स्थानिय) निकाय लेखापरिक्षा व लेखा प्रतिष्ठा भवन,१०१ महर्षी कर्वे मार्ग, मुंबई-४०००२०

१५. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.

१६. नियोजन विभाग (का-१४३१) /मंत्रालय, मुंबई-३२

१७. वित्त विभाग (व्यय-१ व अर्थसंकल्प - १३) / मंत्रालय, मुंबई-३२

१८. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव

१९. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव

२०. निवड नस्ती (कार्यासन -४अे)